कृपया प्रसिद्धीसाठी

**प्रेसनोट**

**पोलिसी चातुर्याला तंत्रज्ञानाची जोड – ३६तासांत मुद्देमालासह भामटा कोठडीत**

ओएलएक्स वर एक जाहिरात येते, 'रूम पार्टनर पाहिजे'. एक समवयस्क मुलगा येतो, आणि खोलीतील मुलांपैकी एकाचा लॅपटॉप आणि मौल्यवान वस्तू घेऊन शिताफीने फरार होतो. पण मुलं हातपाय न गाळतापोलिसांकडे धाव घेतात आणि अक्षरशः सुतावरून स्वर्गाला पोचावं तशा पद्धतीने पुण्यातील अलंकार पोलीस स्टेशनमधील पोलीस थेट परभणीला जाऊन चोर महाशयांना शोधून मॅजिस्ट्रेटच्या कोठडीत पोचवतात, अवघ्या ३६ तासांत!

पुण्यात तिघे-चौघे विद्यार्थी किंवा नोकरदार तरुण मिळून सदनिका भाड्याने घेण्याचे प्रमाण मोठे आहे. या प्रकरणात तिघेजण भागीदार, चौथ्याच्या शोधात होते. ओएलएक्स च्या माध्यमातून जाहिरात दिल्यावर राम जनार्दन भोंडवे नामे एक तरुण जागा पाहाण्यास आला. सर्व अटी मान्य झाल्या, मूळ रहिवाशांनीही मान्यता दिली. परंतु रामकडे काहीच पैसे नव्हते, त्यामुळे या नव्या दोस्तांकडून त्याने रु. १५०० उसने घेतले, परत जाऊन सामान आणले. पुण्यात राहाण्याचा काहीच ठिकाणा नसल्याने करार वगैरे होण्याअगोदरच संमती घेऊन तो सदनिकेतराहाण्यास आला. दुसऱ्या दिवशी सकाळी घरात राहाणारेदोघेजण आपापल्या कामावर निघून गेले. तिसरा स्नानाला गेल्यावर रामने त्याचा लॅपटॉप व लॅपटॉपच्याबॅगमधील अन्य महत्त्वाची कागदपत्रे व रोख रक्कम घेऊन सामानासह पोबारा केला.

चोरी झाल्याचे लक्षात येताच मुलांनी पोलिंसांकडे धाव घेतली. नाव आणि मोबाईल क्रमांक एवढ्या भांडवलावर पोलिंसांनी त्याचा माग काढला. संशयित परभणी परिसरात आहे असे समजल्यावरून अलंकार पोलीस स्टेशनमधील पोलीस उपनिरीक्षकआडकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस फौजदार वेगरे, पोलीस नाईक कटके हे परभणीत पोचले. आयुक्तालयातील परिमंडल ३ गुन्ह्याच्या शोधात तंत्रज्ञानाची मदत देते. परिमंडल ३, यांनी सतत तांत्रिक मदत करून संशयित व्यक्तीचा ठावठिकाणा कळवत राहाण्याचे महत्त्वाचे काम केले. दुसऱ्या दिवशी दुपारी १२ च्या सुमारास परभणीतील पोलीस ठाण्यापासून या दोघांनी तपासाला सुरुवात केली. संशयित आरोपीचे संभाव्य क्षेत्र बरेच मोठे होते, त्यात वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, परभणीचा परिसर, त्यातील १८ वसतिगृहे, रेल्वे पूल व निवासी परिसर होता. कटके व वेगरे यांनी अतिशय गुप्तता राखत वेगाने तपास केला व रात्री ९ वाजेपर्यंत,अल्पावधीत संशयिता पर्यंत पोचून त्याला ताब्यात घेतले व मुद्देमाल हस्तगत केला. ताबडतोब त्याला घेऊन दोघे पोलीस पुण्यात परत आले व या भामट्याला तक्रार आल्यापासून ३६ तासांत गजाआड केले.

मुलांनी आपल्याच समवयस्कावर सहज विश्वास ठेवला, परंतु तो अनाठायी ठरला. नवीन रहिवाशाची काहीही शहानिशा न करता, करार न करता, ओळखीची रुजवात न करता निव्वळ विश्वासावर त्याला आपल्या घरात ठेवून घेतले. या भामट्याने त्याचा चांगलाच गैरफायदा घेतला. मुलांनी धीर न सोडता आणि वेळ न घालवता लगेच पोलिसांशी संपर्क साधला. तंत्रज्ञानाच्या मदतीने आणि त्वरेने हालचाल करून पोलिसांनी भामट्याला पकडले, हे खरे असले, तरी कोणत्याही अपरिचित व्यक्तीला घरात थारा देताना संपूर्ण काळजी घेतलीच पाहिजे.